Metric 3.2.1 - Average number of research papers / articles per teacher published in Journals notified on UGC website during for the academic year 2023-2024.

Clarification Asked-

HEI has not provided any supporting documents as per SOP HEI needs to provide the First page of the article/journals with seal and signature of the Principal E-copies of outer jacket/contents page of the journals in which articles are published

Response

1. First page of the article/journals with seal and signature of the principal are attached. (Appendix-I)

# Appendix-I

# 2023-2024

११) शिफारशी :—

१. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनाच्या वहया रोज तपासाव्यात.

२. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात सुधारणा होण्यासाठी आदर्श हस्ताक्षरांचा नमुना त्यांना द्यावा.

३. निबंधलेखन कौशल्य विकसनासाठी शहरातील शाळांनी एकत्र येऊन मनोरंजनात्मक उपक्रम राबवावेत.

**संदर्भ ग्रंथ:—**


१) कुंडले मधुकर (१९८४) मराठीचे अध्यापन पुणे श्री विद्या प्रकाशन

२) पाटील लिला (१९६४) मातृभाषेचे अध्यापन पुणे व्हिनस प्रकाशन

३) ब.बि. पंडित (१९६७) शिक्षणातील संशोधन नूतन प्रकाशन पुणे

४) डॉ. पिचल नलिनी, प्राचार्य कुलकर्णी व्ही. आर, डी. शेवतेकर शारदा बनकर पनाजी सांगळे के. एन. डॉ. टोपकर रेखा श्री पाईकराव विजयकुमार, डॉ. गंधे, सुधाकर बैंगन, डॉ.हसिना (२००४) आशययुक्त अध्यापन पध्दती (मराठी) नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

५) फडके ना. सी. (१९६६) निबंध सुगंध पुणे व्हिनस प्रकाशन (आ. १)

६) मुळे रा.रा. आणि उमाठे वि. तु. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची भुलतत्वे (आ.इ.) विद्याप्रकाशन नामपुर)

7) Jain Mahesh K. (2000) Research methodology and stastical Techiques, New Delhi: Shra pub.

8) Cates W.M. (1985) A Practical guide to educatinal research. Englewood Ctiffs. N. J. Prentice Holl


❑❑❑

**15**

# स्त्री शिक्षणाला वृध्दिंगत करण्याकरीता राबविण्यात आलेल्या उपाययोजनांचा अभ्यास


डॉ. लीना भागवतराव तायवाडे
सहाय्यक प्राध्यापक,
एम.ए. (भुगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र),
एम. एड. सेट, पी. एच. डी. (शिक्षणशास्त्र),
शिलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन वाडी नागपूर


या अभ्यासाअंतर्गत स्त्रियांच्या परिस्थितीचा त्यांच्या शिक्षणाचा आणि त्यांच्यासाठी असलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनाचा प्रमुख उद्देश स्त्रियांसाठी असलेल्या योजनांचा अभ्यास करणे हा आहे. व त्यासाठी ऐतिहासीक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला व त्यांअंतर्गत प्राथमिक आणि व्दितीयक स्त्रोतांचा वापर करण्यात आला. स्त्रियांची शैक्षणिक स्थिती बघता या संशोधनाची आवश्यकता आढळुन आली. या संशोधनामुळे त्यांच्यामध्ये परिस्थितीनुसार घडलेल्या शैक्षणिक बदलांची माहिती झाली आहे.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता या उक्तीचा विचार केल्यास स्त्रीचे स्थान लक्षात येते. स्त्री ही शक्ती आहे. भारताच्या अवनतीच्या अनेक कारणांपैकी स्त्रीची कूचंबणा हे ही एक कारण आहे प्राचीन काळात स्त्रिया शिक्षण घेत असत उच्च शिक्षण घेत. पण मध्यंतरीच्या काळात ही परंपरा खंडीत झाली. आज स्त्रीपुरुष समानतेचे युग आहे व ह्या युगात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने कार्य करण्याची प्रेरणा देण्यात येते. शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होय. सर्वांगिण विकासात ज्ञानसंवर्धन, बौध्दिक व वैचारिक विकास, व्यावहारिक कार्यक्षमता, व्यावसायिक पात्रता, शारिरीक स्वास्थ, नागरिकत्व व



SHEELADEVI COLLEGE OF EDUCATION WADI, NAGPUR
Principal
Sheeladevi College of Education
Wadi, Nagpur-440023.

Impact Factor-8.632 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## June-2023

ISSUE No - (CDXIX) 419 & Vol.-B

## ENVIRONMENT : ISSUES & CHALLENGES



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
**Dr. Archana S. Dabane**
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

**Editor**
**Dr. Sandip B. Kale**
Assistant Professor & Head
Department of Political Sci.
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

COLLEGE OF EDUCA WADI NAGPUR

Principal
Shaaladevi College of Education

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue No(CDXIX)) 419 & Vol.- B
ISSN : 2278-9308
June 2023

# स्त्री शिक्षणाला वृध्दिंगत करण्याकरीता आधुनिक काळातील स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास

**डॉ. लीना भागवतराव तायवाडे**
सहाय्यक प्राध्यापक
एम.ए. ( भुगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र ) एम. एड. सेट, पी. एच. डी. (शिक्षणशास्त्र)
शिलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन वाडी नागपूर

**या अभ्यासाअंतर्गत आधुनिक काळातील स्त्रीयांच्या परिस्थितीचा त्यांच्या शिक्षणाचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनाचा प्रमुख उद्देश आधुनिक काळातील स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करणे हा आहे. व त्यासाठी ऐतिहासीक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला व त्यांअंतर्गत प्राथमिक आणि व्दितीयक स्त्रोताचा वापर करण्यात आला. स्त्रीयांची शैक्षणिक स्थिती बघता या संशोधनाची आवश्यकता आढळुन आली. या सशोधनामुळे त्यांच्यामध्ये परिस्थितीनुसार घडलेल्या शैक्षणिक बदलांची माहिती झाली आहे.**

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता'या उक्तीचा विचार केल्यास स्त्रीचे स्थान लक्षात येते. स्त्री ही शक्ती आहे. भारताच्या अवनतीच्या अनेक कारणांपैकी स्त्रीची कुचंबणा हे ही एक कारण आहे प्राचीन काळात स्त्रिया शिक्षण घेत असत उच्च शिक्षण घेत. पण मध्यंतरीच्या काळात ही परंपरा खंडीत झाली. आज स्त्रीपुरुष समानतेचे युग आहे व ह्या युगात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने कार्य करण्याची प्रेरणा देण्यात येते. शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होय. सर्वांगिण विकासात ज्ञानसंवर्धन, बौध्दिक व वैचारिक विकास, व्यावहारिक कार्यक्षमता, व्यावसायिक पात्रता, शारिरीक स्वास्थ, नागरिकत्व व सामाजिकता अशा सर्व घटकाचा अंतर्भाव होतो.शिक्षण ही एक व्यापक प्रक्रिया आहे.

नवीन आर्थिक उत्साह प्रत्येकाची शिक्षणाची संधी ही वाढत आहे. त्याचप्रमाणे आधुनिकीकरण होत असल्यामुळे प्रत्येक स्त्री ही तिच्या पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडत आहे. स्वतःच्या प्रगतीसाठी आज स्त्रिया आपल्या चौकटीतून बाहेर येऊन समाजात अभिमानाने वावरत आहे. याला मूळ कारण आहे तो स्त्रियांचा आत्मविश्वास, आणि हा आत्मविश्वास वाढविण्यासाठी सिहांचा वाटा आहे तो शिक्षणाचा. शिक्षणामुळे स्त्रिया आपली स्वतःची ओळख व स्वतःचे अस्तित्व निर्माण करीत आहेत. कितीही जबाबदारी असो तरीपण त्या हसतमूखाने पार पाडून स्वतःचा विकास घडविणे हे एकच ध्येय मनाशी धरुन स्त्रिया आपलीवाटचाल करीत आहेत. स्वामी विवेकानंदाच्या मते, 'स्त्रियांना जर शिक्षण मिळाले तर त्या स्वतः स्वतःच्या समस्या सोडवतील. त्यांना आजपर्यंत असाहाय्यता, दास्य, परावलंबन याचेच शिक्षण मिळाले आहे. त्यांच्या अंगी पराक्रम, आणि विरता निर्माण होईल असे शिक्षण त्यांना दिले पाहिजे. आजच्या काळात स्त्रियांनी सुध्दा आत्मसंरक्षण करण्यास शिकले पाहिजे.

## vH;kl kph vko';drk

स्त्री शिक्षण अत्यंत आवश्यक गरज आहे कारण घरात जर स्त्री शिक्षित असेल तर ती आपल्या संपूर्ण परिवाराला चांगले संस्कार देण्याचे कार्य करते. स्त्रियांच्या भरवशावरच एक चांगला समाज घडवू शकतो. त्याचप्रमाणे स्त्रिया शिक्षणाच्या जोरावर स्वतःचे अस्तित्व निर्माण करु शकतात आणि आपली प्रगती करु शकतात. समाजाचा विकास व्हायचा असेल तर सर्वप्रथम स्त्री शिक्षणाला प्राधान्य द्यावे लागेल. स्त्रियांच्या आंतरिक गुंणाचा विकास करणाऱ्या शिक्षणाची आज खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे. मुलाप्रमाणेच मुलींच्या ही शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे.

प्रस्तुत संशोधनात स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी शिक्षण हा एक मात्र पर्याय उपलब्ध होता त्यामुळे स्त्रियांचा सर्वांगिण विकास झाला त्यांच्या विचारशैलित परिवर्तन झाले. पण हा विकास होण्यासाठी त्यांच्या शिक्षणात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे अगदी आवश्यक होते. त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अनेक उपाययोजना अमलात आणाव्या लागल्या. प्राचीन काळापासून आधुनिक काळपर्यंत स्त्रियांच्या विकासाकरिता व त्यांना घडविण्याकरीता ज्या उपाययोजना अमलात आणल्या गेल्या आहे त्या सर्व उपाययोजनेची माहिती जाणण्यासाठी या विषयावर संशोधन करण्याची आवश्यकता लक्षात येते. त्यामुळे संशोधिकेने प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

COLLEGE OF ... WADI, NAGPUR
Principal
Sheeladevi College of Education
Wadi, Nagpur-440023.